नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 17/06/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

## नागपूर ग्रामिण व नागपूर शहर परिसरात घरफोडी व चोरीचे गुन्हे करणाऱ्या तसेच नागपूर शहरातील विवीध पोलीस ठाणे मध्ये वांटेड असलेल्या अट्टल गुन्हेगारांचे टोळीस स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामिण यांनी चोरीच्या मुद्देमालासह केले जेरबंद

लॉकडाउन काळात नागपूर ग्रामिण जिल्हयात घरफोडीच्या घटना होत असल्याने, मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण यांनी सदर घरफोडीचे घटनांना गांभीर्याने घेउन स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामिणचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांना जिल्हयात सातत्याने होणा–या घरफोडीचे घटनांना प्रतिबंध करून आरोपीतांना तात्काळ जेरबंद करण्याबाबत आदेशीत केले. त्याप्रमाणे गुन्हे शाखा, नागपूर ग्रामिणचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांनी तात्काळ गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हयात वारंवार होणा–या घरफोडींना आळा घालण्याकरिता व घरफोडीचे आरोपीत यांना जेरबंद करण्याकरिता सुचना देवुन सर्व गुन्हे शाखेचे टीमला कार्यप्रवण केले.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे कन्हान उपविभागाचे पथक दिनांक 16/06/2020 रोजी गस्त करित असतांना, पथकाला खात्रीशीर गोपनिय माहितगारामार्फत माहिती प्राप्त झाली की, नागपूर ग्रामिण जिल्हयात घरफोडी करून चोरी करणारे गुन्हेगारांची टोळी ही सरस्वती नगर, कळमना वस्ती, नागपूर शहर येथे एका घरात लपुन आहे. अशा प्राप्त माहितीची योग्य खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तेथे दुपारी 03:00 वाजताचे दरम्यान धाड टाकली असता, तेथे दोन इसम हे पोलीसांना मिळुन आले. पोलीसांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे 1) अक्षय दिलीप भैसारे, वय अं. 27 वर्ष, रा. प्लॉट नं. 20, धरम नगर, रामभुमी सोसायटी, पो. स्टे. कळमना, नागपूर व 2) नरेश अंकालू महिलांगे, वय अं. 22 वर्ष, रा. पुजन वाडी गल्ली नं. 11, डिप्टी सिग्नल, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर असे सांगीतले. पोलीसांनी त्यांना सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचा आणखी एक साथीदार 3) मुकेश रघूनाथ जांभूळकर, वय अं. 25 वर्ष, रा. मंगळवारी, रामटेक जि. नागपूर सध्या मु. खसाळा–म्हसाळा, कामठी रोड, दोन नंबर नाका, नागपूर यांचेसह लॉकडाउन काळात तसेच यापूर्वी देखील अनेक ठिकाणी गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. त्याप्रमाणे आरोपी मुकेश जांभुळकर यास पोलीसांनी कामठी रोड येथुन ताब्यात घेतले.

यातील आरोपीतांनी मागील वर्षी जुन महिन्यात तारसा जॉईंट, ता.मोदा, जि.नागपूर येथील एका राईस मील मालकाचे घरामधुन सोन्याचे दागीने चोरल्याचे कबुल केले. आरोपींनी चोरलेले सोन्याचे दागीने हे 4) अक्षय अनिल इंदोरकर, वय 24 वर्ष, रा. आदर्श नगर, राणी दुर्गावती चौक, पो.स्टे. पाचपावली, नागपूर शहर 5) राजु देवराव राउत, वय 30 वर्ष, रा. बाबा दिपसिंग नगर, समता नगर रोड, पो. स्टे. जरीपटका, नागपूर शहर यांना विकल्याचे सांगीतल्यावरून त्यांना राणी दुर्गावती चौक येथुन ताब्यात घेऊन त्यांचेकडुन सोन्याची लगडी जप्त करण्यात आली आहे.

नमुद आरोपीत यांनी खालीलप्रमाणे नागपूर ग्रामिण जिल्हा तसेच नागपूर शहर येथे विवीध ठिकाणी घरफोडी व चोरीचे गुन्हयांची कबुली दिलेली आहे. तसेच ते नागपूर शहरातील विवीध पोलीस ठाणे येथील गुन्हयात फरारी असल्याचे देखील निष्पन्न झाले आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे :–

| अनु. क्र. | पोलीस ठाणेचे नाव | अपराध क्रमांक व कलम |
|---|---|---|
| 1 | मौदा, नागपूर ग्रामिण. | 333/20, कलम 457, 380 भादंवि. |
| 2 | मौदा, नागपूर ग्रामिण | 335/20, कलम 379 भादंवि. |
| 3 | मौदा, नागपूर ग्रामिण | 282/2020 कलम 461, 380 भादवि. |
| 4 | मौदा, नागपूर ग्रामिण | 220/20 कलम 457, 380 भादंवि. |
| 5 | खापा, नागपूर ग्रामिण | 157/20, कलम 457, 380 भादंवि. |

| | | |
|---|---|---|
| 6 | नंदनवन, नागपूर शहर | 201/20, कलम 379 भादंवि. |
| 7 | नविन कामठी, नागपूर शहर | 40/20, कलम 457, 380 भादंवि. |
| 8 | नविन कामठी, नागपूर शहर | 197/20, कलम 457, 380 भादंवि. |
| 9 | कोराडी, नागपूर शहर | 265/19, कलम 454, 457, 380 भादंवि. |
| 10 | लकडगंज, नागपूर शहर | मा. न्यायालयाव्दारे प्राप्त पकड वारंट. |

नमुद आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| अनु. क्र. | जप्त मुद्देमालाचे वर्णन | किंमती. |
|---|---|---|
| 1 | अं. 80 ग्रॅम वजनाची सोन्याची लगडी. | 3,20,000/– रूपये |
| 2 | एम.एच.49ए.एन.1009 क्रमांकाची हीरो कंपनीची मॅस्ट्रो मोपेड गाडी. | 15,000/– रूपये |
| 3 | एम.एच.40.ए.जे.6447 क्रमांकाची बजाज डीस्कव्हन मोटरसायकल. | 50,000/– रूपये |
| | एकुण | 3,85,000/– रूपये |

नमुद ताब्यात घेण्यात आलेल्या पाचही आरोपीतांना पुढील कायदेशिर कार्यवाही करिता पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर ग्रामिण, अपर पोलीस अधिक्षक मा. श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अनिल जिट्टावार, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामिण, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि सचिन मत्ते, सफौ. लक्ष्मीप्रसाद दुबे, हेकॉ सुरज परमार, हेकॉ निलेश बर्वे, नापोशि शैलेश यादव, सत्यशिल कोठारे, दिनेश आधापूरे, पोशि प्रणय बनाफर, विरेंद्र नरड, अमोल वाघ, रोहन डाखोरे व चा.सफौ. साहेबराव बहाळे, चापोशि आशुतोष लांजेवार यांचे पथकाने केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर